# श्रीमती इंदिरा गांधी यांच्या परराष्ट्र धोरणातील यथार्थता

**चोथे अशोक उत्तमराव ,स्वप्नील अंकुशराव बोधणे**
राज्यशास्त्र विभाग न्यु. आर्टस, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, डॉ. बा.अं.म.विद्यापीठ, औरंगाबाद

***सारांश*** **:**भारताच्या परराष्ट्र धोरणाबाबतचे जे काही साहित्य उपलब्ध आहे त्यात असे दिसते की, भारताने पारंपारिक भूमिकेपासून ते वास्तवाद सिध्दांत नविन वास्तववादाचा सिध्दांत, आदर्शवादा सिध्दांत यांचा वापर परराष्ट्र धोरणाचा जागतिक राजकाराणावरिल प्रभाव हा वेगवेगळया नेतृत्वामध्ये वेग–वेगळया प्रकारे कमी अधिक प्रमाणात पडलेला दिसून येतो. पंडित नेहरु ते आजपर्यंत म्हणजे डॉ. मनमोहन सिंग यांच्यापर्यंत भारतीय परराष्ट्र धोरणाचे महत्व हे व्यक्तीपरक वेग–वेगळे असलेले आढळून येते. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पाया पंडित नेहरु यांनी घातला व त्यांनी एका आदर्शवादी सिध्दांतावर भारताच्या परराष्ट्र धोरणाची दिशा निश्चित केली परंतु पंडित नेहरुंना आदर्शवाद व वास्तवाद यांचा समन्वय साधता आला नाही. नेहरुंच्या काळातील परराष्ट्र धोरणाची सर्वात मोठी कमजोरी राहिली. देशाच्या सीमांचे रक्षण न करु शकणे. ए.डी. गोरवाला म्हणतात, की परराष्ट्र धोरणांचा मुख्य उद्देश हा राष्ट्रीय हित साधणे हा असतो आणि देशाच्या अखंडतेचे रक्षण हे सर्वात मोठे हित आहे व यातच भारताचे परराष्ट्र धोरण अपयशी ठरले आहे. [1]

***प्रस्तवाना*** **:**

पंडीत नेहरु यांच्या मृत्युनंतर श्री लालबहादुर शास्त्री हे भारताचे पंतप्रधान बनले आणि त्यांनी देखिल आंतरराष्ट्रीय राजकारणात नेहरुंच्याच धोरणाचे अनुकरण केले. श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान होईपर्यंत भारताच्या परराष्ट्र धोरणाला आदर्शवाद व यथार्थता किंवा वास्तववाद यांची सांगड घालायला जमलेच नाही. त्याची खरी सुरुवात श्रीमती इंदिरा गांधी यांनीच केली.

श्रीमती इंदिरा गांधीनी आपल्या परराष्ट्र धोरणाचा आधार राष्ट्रीय हिताचे रक्षण निश्चित केला. त्यांनी सर्व विवादयुक्त विषयांमध्ये आपला स्वतंत्र दृष्टिकोन स्वीकारला करोडो भारतीयांची भुक, अनारोग्य व निरक्षरता दुर करण्यासाठी त्यांनी आदर्शवादी सिध्दांतापासुन दुर जाऊन यथार्थच्या पार्श्वभुमीवर येऊन आपल्या परराष्ट्र धोरणाच्या वेग–वेगळया पैलुंना निश्चित केले. त्यांनी अखंडता व गट निरपेक्षतेच्या धोरणाची व्याख्या जागतिक राजकारणाच्या बदलत्या संदर्भात केली. त्यांनी आचार्य कौटिल्याच्या विचारांचा वापर आपल्या परराष्ट्र धोरणात केला. 1971 च्या भारत–पाक संघर्षात श्रीमती इंदिरा गांधी यांनी बांगलादेश स्वतंत्र करण्यात महत्वाची

भुमिका बजावली अशा बिकट पेचप्रसंगात त्यांच्या यथार्थवादी विचारांचा फायदा भारताच्या परराष्ट्र धोरणास मोठया प्रमाणात झाला. या युध्दानंतर जागतिक राजकारणात भारताचा गौरव खुप जास्त वाढला. श्रीमती गांधीनी अमेरिका व चीनच्या त्या संयुक्त कारस्थानला पाहु इच्छित होते. कलीरचे संपादक आर. के. करंजीया यांनी भारत–पाक युध्दाच्या काळात श्रीमती इंदिरा गांधीच्या कुशल व ठाम नेतृत्वाच्या संदर्भात आपल अशी टिप्पणी केली होती. “ I combination of chanakya and Churchill ”[2]

1971 च्या बांगलादेश पेचप्रसंगाच्या वेळी भारताला एक ही मोठा देश साथ देण्यास तयार नव्हता. एवढेच काय तर रुस सहित कोणतेही राष्ट्र पाकिस्तानावर दबाव टाकण्यासाठी तयार नव्हते. अशा स्थितीत श्रीमती इंदिरा गांधीना जाणवले की पाकिस्तान, चीन, तसेच अमेरिकेची धुरी भारताच्या विरुध्द आहे. त्यामुळे भारताला पाकिस्तान, चीन आणि अमेरिकेच्या विरुध्द अजुन कुठे तरी मदतीची आवश्यकता आहे आणि अशा वेळी इंदिरा गांधी यांनी आपल्या व्यावहारिक धोरणाने 6 ऑगस्ट 1971 ला सोव्हिएत रुस तसेच भारतामध्ये सद्भावना आणि मैत्रिचा करार घडवून आणला. त्यांनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात तीच कार्ये केली जी त्यांच्या देशासाठी फायदेशीर ठरत होती. त्यांनी अखंडता व गट–निरेपेक्षतेच्या धोरणाची व्याख्या जागतिक राजकारणाच्या बदलत्या संदर्भात केली. त्यांनी 1947 पासुन चालविल्या गेलेल्या त्या परराष्ट्र धोरणाच्या विरुध्द विद्रोह केला ज्याचा आधार एक कमकुवत आणि गरिब भारत होता. त्यांना सत्तेमध्ये येताच अशी जाणीव झाली की भारताची भू–राजकीय स्थिती, आकार, लोकसंख्या इत्यादी त्याला एक मोठया राष्ट्रात रुपांतरित करु शकतात आणि जगाच्या राजकारणात भारत एक सशक्त भुमिका बजावु शकतो म्हणुन त्यांनी जगातील सामर्थ्यशाली राष्ट्र अमेरिका, रुस, फ्रान्स, इंग्लंड व चीनच्या बाबतीत व्यवहारिक दृष्टिकोन स्वीकारला व आशियाई व अफ्रीकी देशांविषयी प्रगतीशील सामाजिक क्रांतीच्या कल्पनांच्या आधारावर निर्णयात्मक राजकारणाच्या क्षेत्रात त्यांनी ब–याच वेळा निराशवाद्यांना खोटे सिध्द केले. या कराराविषयी संपुर्ण जगात तीव्र प्रतिक्रीया झाली आणि कराराच्या बाजुने व विरोधात राजनीतिज्ञांनी आणि राजकारणाची समिक्षा कारणा–यांनी आपले–आपले तर्क सादर केले. या कराराच्या विरुध्द असा तर्क दिला गेला की हा करार खरेतर मैत्री, शांतता आणि सहकार्याचा करार नाही तर हा सुरक्षिततेचा करार आहे जसे की याच्या कलम 9 वरुन स्पष्ट होते या कराराचे मुल्यांकन करतांना दैनिक हिंदुस्थान, टाईम्सने 10 ऑगस्ट 1971 ला आपल्या संपादकीय लेखात लिहिले होते :

“ There is absolutely no doubt that in entering into security arrangement with one of worlds two super powers. India has abandoned non-alignment and will in the eyes of many third contries regards as having aligned if self with soviet.”[3]

श्रीमती इंदिरा गांधी यांनी भरताला एका शक्तीशाली राष्ट्राच्या रुपात कुटनीतीक मंचावर सादर करण्यासाठी, 18 मे 1974 ला पहिला अणुस्फोट करुन जागतिक राजकारणात भारताला एका महाशक्तीच्या रुपात उभे केले आणि मोठया राष्ट्रांना आश्चर्यचकीत केले. श्रीमती इंदिरा गांधीना आपली सक्रीयता आणि कुटनीतीकतेचा परिचय देऊन यशस्वी अणुस्फोटाच्या माध्यमातुन देश–विदेशात भारताचे शिर उंचावले. या ऐतिहासिक घटनेची जगातील सर्वच वर्तमानपत्रामध्ये चर्चा झाली. भारतीय परराष्ट्र धोरणाच्या इतिहासात पहिल्याच वेळेस भारतीय पंतप्रधानेने एका लोकशाही देशाच्या स्वतंत्र इच्छा शक्तीचा वापर केला. भारत एक अणुराष्ट्र बनल्यामुळे चीनला भारताची अवहेलना करणे शक्य नव्हते. माओत्सेतुंग यांनी सांगितले होते की ' सत्तेचास्त्रोत बंदुकीच्या नळीमध्ये असतो . '[4]श्रीमती इंदिरा गांधीनी हे सिध्द केले की बंदुक फक्त चीन मध्येच तयार होत नाही. त्या देशांमध्ये देखील तयार होऊ शकते ज्यांना चीन आतापर्यंत अपमानीत करत आला आहे. श्रीमती इंदिरा गांधीनी मार्च 1977 पर्यंत एका दीर्घ काळापासुन चालत आलेल्या आणि नाईलाज वाटणा–या राष्ट्रीय प्रश्नांना सोडविण्यांत उल्लेखनीय यश मिळविले सदभावना, सहानुभुती आणि मानवी दृष्टिकोनाच्या माध्यमातुन त्यांनी काश्मीर आणि सिक्कीमच्या समस्या सोडविल्या. राज्य विधानसभेत बोलतांना जम्मु–काश्मीर राज्याचे मुख्यमंत्री शेख अब्दुल्ला म्हणाले इंदिराजी भारताच्या निर्विवाद नेत्या आहेत आणि त्यांनी या देशासाठी किती तरी वादळांना तोंड दिले आहे. [5] इंदिरा गांधीचे विचार ऐकल्यानंतर नेपाळचे पंतप्रधान किर्तीनिधी निष्ठा यांनी भारताविरोधी दृष्टिकोन असुन देखील ते इंदिरा गांधीमुळे इतके प्रभावित झाले की, ते म्हणाले श्रीमती इंदिरा गांधी दक्षिण आशियातील श्रेष्ठनेत्या आहेत आणि त्यांनी दक्षिणी देशांच्या लोकांमध्ये सहकार्य तसेच चिरकाळ शांतता निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्वाची भुमिका बजावली. [6]

श्रीमती इंदिरा गांधीनी आपल्या परराष्ट्र धोरणाला अशा प्रकारे कार्यान्वीत केले की, ज्यामुळे भारतातील लोकांचा विश्वास आणि अपेक्षा आंतरराष्ट्रीय जगात कायम ठेवले जाऊ शकेल. श्रीमती इंदिरा गांधीनी सोव्हिएत रुस बरोबर हा करार त्यावेळी केला होता जेंव्हा

ISSN 2231-5063
Volume-3, Issue-2, August-2013

भारतावर बांगलादेशच्या स्वातंत्र्य संघर्षामुळे युध्दाचे ढग गोंगावत होते आणि अमेरिकेने स्पष्टपणे सांगितले होते की, भारतावर चीन तसेच पाकिस्तान दोघांनी मिळून आक्रमण केले तर अमेरिका मदत करणार नाही. त्यामुळे तत्कालीन राष्ट्रीय संकटामुळे भारतामध्ये सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांनी इंदिरा गांधीच्या या महान कुटनीतिक कार्याची प्रशंसा केली होती. हा करार लष्करी करार नाही आणि या कराराने हे सिध्द केले आहे की भारताचे असलग्नतेचे धोरण गतीशील आहे. ज्याला वेग–वेगळया परिस्थितीमध्ये योग्य प्रकारे बसविले जाऊ शकते. श्रीमती इंदिरा गांधीचे हे वैशिश्टय होते की त्या कोणत्याही देशाबरोबर संबंधामध्ये सुधारणा आपल्या अटींवर करत होत्या भलेही तो चीन असो किंवा रुस किंवा अमेरिका त्यांनी आदर्शवादाबरोबरच वास्तवादाचा मेळ घालुन भारताच्या परराष्ट्र धोरणाला व्यावहिरक दृष्टिकोनातुन बघण्याचा नवा पायंउा पाडला. श्रीमती इंदिरा गांधी यांनी भारताची जी प्रतिमा जगाच्या व्यासपीठावर स्थापन केली ती आहे नैतिक, राजकीय, सर्वस्वी स्वतंत्र, सशक्त समर्थ भारताची जो सत्याची पुजा करतो परंतु असल्याचा नायनाट करण्यामध्ये संकोच बाळगत नाही. [7]

थोडक्यात भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रात श्रीमती इंदिरा गांधीचे हे अक्षितीय यश होते की, त्यांनी अमेरिकेला सर्वात आधी अशी जाणीव करुन दिली की, भारत दोन शक्ती–गटामध्ये फक्त एक निरही राष्ट्र नाही तर तो आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपली उज्वल प्रतिमा सादर करण्यास कटिबध्द आहे. भारत हा फक्त जागतिक राजकारणात बघ्याची भुमिका घेणारा देश नसुन त्याला ही त्यात सहभागी होऊन महत्वाची भुमिका बजावयाची आहे. भारताच्या उपेक्षा करुन तुम्ही आशियाखंडातील राजकारण करु शकत नाही. हे प्रथमच इंदिरा गांधीनी बडया राष्ट्रांना सिध्द करुन दाखवल. इंदिरा गांधी यांच्या या यथार्थवादी परराष्ट्र धोरणाची आज देखील प्रासंगिकता आहे आणि यातुन एक प्रकारे शिकवण घेवून भारताचे परराष्ट्र धोरण अधिक व्यावहारिक आणि उपयुक्त होण्यास मदतच होईल. इंदिरा गांधी यांनी जागतिक राजकारणात धोरण निश्चित करतांनी बदलत्या परिस्थितीचा विचार योग्य प्रकारे केलेला दिसुन येतो. तेच धोरण सर्वात उपयुक्त ज्या धोरणामुळे तत्कालीन हित साध्य होईल आणि प्रसंगी दुरदृष्टीचा देखील विचार केला जाईल. इंदिरा गांधीनी राष्ट्रीय हिताला अधिक प्राधान्य दिले. राष्ट्रीय हित डोळयासमोर ठेवून त्यांनी प्रसंगानुरुप अनेक धाडसी निर्णय घेतले जे अप्रिय वाटत असले तरी काळानुरुप योग्य होते. त्यांच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव जागतिक राजकारणात आणि भारतातील राजकारणात मोठया प्रमाणात पडलेला दिसुन येतो अशा कणखर, धाडसी नेतृत्वावी आजदेखील भारताच्या परराष्ट्र धोरणाला गरज आहे. त्यांच्या परराष्ट्र धोरणची प्रासंगिकता आज ख–या अर्थाने आहे असे म्हणता येईल.

1.फाडिया बि.एल. प्रतियोगिता साहित्य सिरीज, आग्रा, पे. 649.
2.R.K. Karanjia-Blitd. 17 Dec. 1971, p.2.
3.The Hindustan Times, 10th Aug.,1971.
4.Dinman, Weekly 23rd June, 1974,p.27.
5.Peace and Friendship-of cit, p.3.
6.भाविन कुर्वे का लेख– भारत– नेपाळ संबंध, 18 फरवरी 1973, पे. 161.
7.कन्हैयालाल मिश्र– 'प्रभाकर'इंदिरा गांधी, पे. 149.